CNR NO.MHRT09-000295-2017

# नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ३०/२०१७ मधील निशाण ३६ वरील आदेश

१. वादी यांनी हा अर्ज दावा मिळकत गट नं. १४२ मधील काजू व आंबा कलमांच्या लिलावाकरीता कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी नं.१ यांनी या अर्जास निशाण ३९ वर म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत.

३. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे दावा मिळकती या वादी व प्रतिवादींचे पूर्वाधिकारी सदाशिव रामाणे यांचेपासून वारसाहक्काने आलेल्या मिळकती आहेत. दावा मिळकतींपैकी गट नं. १४२ मध्ये २० वर्षांची हापूस आंब्याची आठ झाडे आणि १० वर्षांची काजूची ११० कलमे आहेत. आंबा कलमे ही वडिलोपार्जित असून काजू कलमे ही वादी यांनी स्वतः लावलेली व जोपासलेली झाडे आहेत. प्रतिवादी नं.१ हे या मौल्यवान झाडांचे उत्पन्न व उपभोगापासून वादींना वंचित ठेवत आहेत. त्यामुळे, दावा मिळकत गट नं.१४२ मधील आंबा व काजू कलमांचा लिलाव करुन त्यातून येणारे रक्कमेचे दाव्याचे अंतिम निकालासमयी वादी व प्रतिवादी यांच्या हिश्याप्रमाणे वाटप होणे आवश्यक आहे. त्या करिता कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. प्रतिवादी नं.१ यांनी निशाण ३९ वर या अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने स्पष्ट शब्दात नाकारली आहेत. प्रतिवादी नं.१ यांचे कथनांप्रमाणे दावा मिळकतीमध्ये जूनी दोन हापूस व तीन पायरी आंब्याची झाडे असून ती झाडे प्रतिवर्षी धरत नाहीत. प्रतिवादी नं.१ यांनी लावलेली व जोपासलेली सात ते आठ वर्षांची सुमारे ४० काजू झाडे व दोन ते तीन वर्षांची ६० ते ७० काजूची झाडे असून त्या झाडांशी वादी यांचा कोणताही संबंध नाही. वादीने प्रतिवादी नं.१ व त्यांची पत्नी यांचा सांभाळ न केल्याने प्रतिवादी नं.१ यांनी वादी यांचे विरुध्द पोटगीची केस दाखल केली होती. त्यामुळे, वादी यांनी

हा खोटा दावा दाखल केला आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती प्रतिवादी नं.१ यांनी केली आहे.

५. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस. धामणस्कर व प्रतिवादी नं.१ तर्फे विधीज्ञ श्री. एन.के.चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला.

६. वादी व प्रतिवादी यांनी केलेली परस्पर विरोधी कथने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील कारणमिमांसेसहित निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणी करतात त्याप्रमाणे दावा मिळकत गट नं.१४३ मधील काजू व आंबा कलमांच्या लिलावा करीता कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होऊन मिळणेसाठी वादी पात्र आहेत काय ? | .........नाही. |
| २. | काय आदेश ? | ..........अर्ज नामंजूर करणेत येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ बाबतः</u>–

७. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी हा दावा गट नं.१४२ व अन्य दावा मिळकतींची वाटणी होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांनी दाव्याचे कामी दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी केली नसल्याचे दिसून येते. वादी यांचे कथनांप्रमाणे गट नं.१४२ व अन्य दावा मिळकती ह्या वादी व प्रतिवादी नं.१ ते १० यांच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. प्रतिवादी नं.१ यांनी या कामी अद्याप कैफियत दिलेली नाही.

८. प्रतिवादी नं.१ हे वादी नं.१ व २ यांचे वडील आहेत, याबाबत वाद नाही. प्रतिवादी नं.१ यांनी वादी यांचे विरुध्द पोटगी मिळणेसाठी फौजदारी किरकोळ अर्ज नं.१२६/२०१५ दाखल केला होता व तो अर्ज अंशतः मंजूर करणेत आला, याबाबत वाद नाही.

९. वादी यांचे कथनांप्रमाणे दावा मिळकत गट नं.१४२ मध्ये आंबा कलमे ही वडिलोपार्जित असून काजू कलमे ही वादी यांनी लावलेली व जोपासलेली झाडे आहेत. दावा मिळकत गट नं.१४२ मध्ये २० वर्षांची हापूस आंब्याची ८ झाडे आहेत व दहा वर्षांची काजूची ११० कलमे आहेत. वादी यांनी केलेल्या या कथनांवरुन हापूस आंब्याची झाडे ही २० वर्षांची आणि काजूची झाडे ही १० वर्षांची असल्याचे दिसून येते. वादी नं.१ व २ यांनी दाव्याच्या सरनाम्यात नमूद केलेले त्यांचे वय पाहता ते वय अनुक्रमे २८ व २६ वर्षे आहे. प्रतिवादी नं.१ हे वादी नं.१ व २ यांचे वडील आहेत. त्यामुळे, वादी यांचे वय आणि त्यांनी अर्जात नमूद केलेल्या झाडांचे वय पाहता ही झाडे वादी यांनी लावली व जोपासली, ही बाब सकृतदर्शनी स्वाभाविक वाटत नाही. प्रतिवादी नं.१ यांनी ही झाडे लावली व जोपासली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. वादी यांनी हा दावा वाटपासाठी दाखल केला असला तरी दावा मिळकतींमध्ये त्यांचा हिस्सा अद्यापी ठरलेला नाही. दावा मिळकत गट नं.१४२ मध्ये असलेली आंबा व काजूची झाडे वडिलोपार्जित आहेत किंवा कसे, हे दाव्याचे चौकशी अंती ठरणार आहे. वादी यांनी दाव्याचे कामी दरम्यानचे उत्पन्न ठरवून मिळणेबाबत मागणी केलेली नाही. प्रतिवादी नं.१ यांनी वादी यांचे विरुध्द पोटगी मिळणेसाठी दाखल केलेल्या फौजदारी किरकोळ अर्ज नं.१२६/२०१५ चे कामी वादी यांनी दिलेल्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी नं.१ हे वडिलोपार्जित मिळकतीचे उत्पन्न घेतात, असे कथन केले आहे. त्यामुळे, हा दावा दाखल होण्यापूर्वीपासून प्रतिवादी नं.१ हे या झाडांचे उत्पन्न घेत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. फौजदारी किरकोळ अर्ज नं.१२६/२०१५ चे कामी प्रतिवादी नं.१ यांना वादी यांनी द्यावयाची पोटगी रक्कम ठरविताना प्रतिवादी नं.१ यांना शेतीतून मिळणा–या उत्पन्नाचा विचार करणेत आला आहे. दावा मिळकत गट नं.१४२ मधील आंबा व काजू झाडांपासून मिळणारे उत्पन्न हे प्रतिवादी नं.१ यांच्या उदरनिर्वाहाचे महत्वाचे साधन असल्याचे दिसून येते. या दाव्याची चौकशी होवून अंतिम न्यायनिर्णय होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता

आहे. प्रतिवादी नं.१ यांच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेले आंबा व काजूचे उत्पन्न दरवर्षी न्यायालयात जमा करुन ठेवलेस त्याचा प्रतिवादी नं.१ यांच्या उदरनिर्वाहावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. वादी यांचा दावा मिळकतीतील हिस्सा अद्यापी निश्चित झालेला नाही. त्यांनी या कामी दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी केलेली नाही. त्यामुळे, दावा मिळकत गट नं.१४२ मधील आंबा व काजू कलमांचा लिलाव करुन त्याचे उत्पन्न न्यायालयात जमा करुन ठेवणे योग्य व उचित होणार नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबतः**–

१०. वर नमूद केलेल्या विवेचनावरुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

वादी यांचा निशाण ३६ वरील अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

**दिनांक – ११/०३/२०१९.** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण – लांजा.** **न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग,लांजा,**

**जि.रत्नागिरी.**

*Case No : RCS No.30 of 2017*
*I affirm that the contents of this pdf file Judgment are same words as per original Order/Judgment,*
*Name of the Stenographer: Y.S. Lahute*
*Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,*
*Date of decision :11/03/2019*
*Order/Judgment signed by P.O.on : 11/03/2019*
*Order/Judgment uploaded on :11/03/2019*